मूल्य १ रु.

http://lokadesh.in

# लोकादेश

■ महाराष्ट्र शासन जाहिरात मान्यताप्राप्त साप्ताहिक

मुख्य संपादक : साजीद बडगुजर

किनवट, वर्षे १७ वे, अंक ३५ वा, सोमवार, दि.२६ ऑगस्ट २०२४, पाने ०४

RNI No. MAHMAR/2007/20732 | Post Regd.NO G-2/RNP/NND-323/2023-2025


# मुलींना आता व्यावसायिक अभ्यासक्रमाचे मोफत शिक्षण

- नांदेड विभागात जवळपास १० हजार मुलींना योजनेचा लाभ
- मुलींना परीक्षा व शिक्षण शुल्कात १०० टक्के लाभ मंजुरीसाठी महाविद्यालयांना निर्देश

**नांदेड दि. २३ ऑगस्ट :- व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाृया आर्थिकदृष्टया दुर्बल घटक, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग तसेच इतर मागासवर्ग प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्कात ५० टक्के ऐवजी आता १०० टक्के लाभ मंजूर करण्याबाबतचा निर्णय ८ जुलै रोजी राज्य शासनाने घेतला आहे. या निर्णयामुळे नांदेड विभागातील जवळपास १० हजार मुलींना याचा लाभ होणार असून जास्तीत जास्त मुलींनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक किरणकुमार बोंदर यांनी केले आहे.**



आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील अनेक मुलींना आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण घेताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. त्यामुळे अनेक मुली उच्च शिक्षणापासून वंचित राहत राहण्याची शक्यता होती. मुलींना मोफत उच्च शिक्षण या योजनेत आता त्यांच्या उच्च शिक्षणाचा मार्ग सुकर झाला आहे. नांदेड विभागात एकूण ९७ अनुदानित महाविद्यालय, २१९ विनाअनुदानित महाविद्यालय व एक कृषि विद्यापिठ यांचा अंतर्भाव होतो. मुलींना मोफत उच्च शिक्षण या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी नांदेड विभागातील सर्व शैक्षणिक संस्थाना तसे आदेश दिले आहेत. शैक्षणिक संस्थानी देखील या योजनेला सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याची माहिती उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक यांनी दिली. या योजनेची माहिती व जागृती विद्यार्थीनीमध्येही झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

या योजनेमुळे मुलींना उच्च शिक्षण घेण्यास नक्कीच प्रोत्साहन मिळणार असून या निर्णयामुळे उच्च शिक्षणातील मुलीचा टक्का वाढणार आहे. एकही मुलगी शिक्षणापासून वंचित राहणार नाही. या महत्वाकांक्षी निर्णयामुळे मुली व महिला आत्मनिर्भर व स्वावलंबी होण्यास मदत होणार आहे.

**मुलींनी व्यक्त केला आनंद**

या योजनेसंदर्भात आम्ही नांदेड जिल्ह्यातील अनेक युवतींशी संपर्क साधला असतात त्यांनी या योजनेबद्दल सकारात्मकता नोंदवली आहे. शासनाच्या या योजनेमुळे मुलीच्या उच्च शिक्षणाचा मार्ग सुकर झाल्याचे मत ऋजा पाटील, उन्नती देशमुख, केसर अग्रवाल, मृणाली कदम, तनया हातने, जान्हवी भूजवळ, सोनाली आसटकर, प्रतिक्षा मोरे, गायत्री जोशी, ज्योति पुंडलिक, जानव्ही उदगीरकर विद्यार्थीनींने व्यक्त केले.

## सर्व राज्यांना आणि केंद्रशासित प्रदेशांना केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचा आदेश

# शाळांमध्ये विद्यार्थ्यांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी नवीन मार्गदर्शक सूचना लागे करणे आवश्यक

**नवी दिल्ली, २३ : देशातील सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांची सुरक्षा आणि कल्याण सुनिश्चित ा करण्यासाठी शिक्षण मंत्रालयाने एक महत्त्वपूर्ण निर्णय जारी केला आहे. केंद्रीय मंत्रालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना 'शालेय सुरक्षा आणि सुरक्षिततेबाबतच्या मार्गदर्शक सूचना' लागू करण्याचे निर्देश दिले आहेत.**

शाळा आणि इतर शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांची सुरक्षा आणि कल्याण सुनिश्चित करण्यासाठी शिक्षण मंत्रालय कटिबद्ध आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आणि पोक्सो कायद्याच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, मंत्रालयाने 'शालेय सुरक्षा आणि सुरक्षितताबाबत मार्गदर्शक सूचना-२०२१' विकसित केल्या आहेत. या मार्गदर्शक सूचनांमध्ये शाळा व्यवस्थापनाची जबाबदारी स्पष्ट करण्यासोबतच, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी प्रतिबंधात्मक प्रशिक्षण, अहवाल देण्याची प्रक्रिया आणि सहाय्य यांच्या तरतूदी नमूद आहेत.

**मार्गदर्शक सूचनांचे उद्दिष्टः**

मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्र येऊन शाळांमध्ये सुरक्षित वातावरण निर्माण करण्याच्या आवश्यकतेबाबत विद्यार्थी आणि पालकांसह सर्व भागधारकांमध्ये जागरुकता निर्माण करणे., शारीरिक, सामाजिक-भावनिक, बौद्धिक आणि विशेषतः नैसर्गिक आपत्तींचा सामना करताना सुरक्षा आणि सुरक्षिततेच्या विविध उपायांबाबत आधीच उपलब्ध असलेल्या कृती, धोरणे, कार्यपद्धती आणि मार्गदर्शक तत्त्वांबद्दल विविध भागधारकांमध्ये जागरुकता निर्माण करणे., विविध भागधारकांना सक्षम करणे आणि या मार्गदर्शक सूचनांच्या अंमलबजावणीमधील त्यांची भूमिका स्पष्ट करणे., शाळांमध्ये (शाळेच्या बस मधून शाळेत येताना आणि शाळेतून घरी परतताना होणारी विद्यार्थ्यांची वाहतूक यासह) विद्यार्थ्यांची सुरक्षा आणि सुरक्षिततेसाठी शालेय व्यवस्थापन आणि खासगी/विनाअनुदानित शाळांमधील मुख्याध्यापक आणि शिक्षक आणि सरकारी/सरकारी अनुदानित शाळांच्या बाबतीत शाळेचे प्रमुख/प्रभारी प्रमुख, शिक्षक आणि शिक्षण प्रशासन यांचे दायित्व निर्ि चत करणे.

शाळेमध्ये विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि सुरक्षतेबाबत कोणतीही व्यक्ती अथवा शाळा व्यवस्थापनाकडून होणारे दुर्लक्ष गांभीर्याने घेणे आणि त्याबाबत 'शून्य सहिष्णुता धोरण अवलंबणे हे या मार्गदर्शक सूचनांचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

या मार्गदर्शक सूचना ०१.१०.२०२१ रोजी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना पाठवण्यात आलेल्या आहेत. राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याचे आणि त्यानुसार आपले धोरण तयार करण्याचे निर्देश केंद्रीय शिक्षण मंत्रालयाव्दारे देण्यात आले आहेत.

या मार्गदर्शक सूचनांची संपूर्ण माहिती शिक्षण मंत्रालयाच्या वेबसाइटवर उपलब्ध आहेः https://dsel.education.gov.in/sites/default/files/2021-10/guidelinessss.pdf.

शिक्षण मंत्रालयाचा हा निर्णय शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. यामुळे विद्यार्थी सुरक्षित वातावरणात शिक्षण घेऊ शकतील आणि त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल.

# नागरीकांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी आपले सरकार पोर्टल प्रभावीपणे पध्दतीने राबवा-जिल्हाधिकारी



- आपले सरकार पोर्टल २.० नागरिक आणि प्रशासन यांच्यातील दुवा
- विभागप्रमुखांनी प्रलंबित तक्रारीचा निपटारा करण्यावर भर द्यावा
- जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष प्रशिक्षण सत्राचे आयोजन

**नांदेड दि. २३ ऑगस्ट :- सामान्य नागरिकांना शासकीय कार्यालयात त्यांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी वारंवार भेट देण्याची गरज नसून, त्यांचा वेळ आणि मेहनत वाचविण्यासाठी शासनामार्फत आपले सरकार पोर्टल २.० ही तक्रार प्रणाली सर्व जिल्ह्यामध्ये कार्यान्वित केली आहे. आपले सरकार पोर्टलच्या माध्यमातून नागरिकांना त्यांच्या तक्रारी करता येणार आहेत. या तक्रारीचे विहित कालावधीत निपटारा करण्यावर विभाग प्रमुखांनी प्राधान्याने भर द्यावा. तसेच त्यांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी पोर्टल प्रभावी पध्दतीने राबवा, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले.**

आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवनाच्या कॅबिनेट हॉलमध्ये आपले सरकार पोर्टल प्रभावी पध्दतीने राबविण्यासाठी विशेष प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ते बोलत होते. यावेळी मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अपर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ तसेच विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

राज्यामध्ये आपले सरकार पोर्टलची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी, आपले सरकार पोर्टलवरील प्रलंबित तक्रारीचा १०० टक्के निपटारा व्हावा, यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे विशेष प्रशिक्षण सत्राचे आयोजन प्रत्येक जिल्ह्यात करण्यात येत आहे. आज या प्रशिक्षण सत्रात ई-गव्हर्नस तज्ञ देवांग दवे यांनी या पोर्टलबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच तक्रार करण्यापासून ते तक्रारीचा निपटारा होण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीबाबत प्रात्यक्षिकाचे सादरीकरण केले. तसेच तालुका, जिल्हा पातळीवर या पोर्टलद्वारे तक्रारीच्या निवारणाबाबत पोर्टल अद्ययावत करावे.

आपले सरकार पोर्टल २.० ही प्रणाली पारदर्शक असून प्रत्येक तक्रारीचे ट्रकिंग आणि निराकरण सुनिर्ि चत केले जाते, त्यामुळे शासनावर विास निर्माण होतो. आपले सरकार हे पोर्टल लोकांच्या सेवेसाठी आणि त्यांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी शासनाची कटिबध्दता दर्शविते. अधिका-यांनी हे पोर्टल कार्यक्षमतेने राबविणे अत्यंत महत्वाचे असून ही प्रणाली डेटा वि लेषणाद्वारे मौल्यवान माहिती प्रदान करते. जी पुनरावृत्ती होणा-या समस्यांची ओळख करुन देवून प्रणालीतील समस्यांचे निराकरण करण्यास मदत करते. हे पोर्टलवर केलेल्या तक्रारीचे निवारण करुन सर्व शासकीय विभाग आपल्या कामाची गुणवत्ता सिध्द करु शकते. तसेच तक्रार करणारा व वरिष्ठ कार्यालये या कार्यवाहीचे अवलोकन करु शकतात अशी सविस्तर माहिती ई-गव्हर्नन्स तज्ञ देवांग दवे यांनी या पोर्टलच्या कार्यवाहीबाबत सविस्तर माहिती दिली.

# 'लाडकी बहीण' नंतर 'लाडका शेतकरी' योजना राबवणार : मुख्यमंत्र्यांची घोषणा

## नव कृषी सन्मान योजनेचा चौथा हप्ता शेतक-यांच्या खात्यात



परळी : मुख्यमंत्री माझी लाडकी योजना, अन्नपूर्णा योजना आली. आता आम्ही लाडका शेतकरी ही योजना राबवणार आहोत. शेतक-यांनी त्यांचे बँक खाते तपासावे. त्यांच्या खात्यात दोन हजार रूपये आले आहेत की नाहीत ते पाहावे. शेतक-यांना वरदान ठरणा-या योजना बंद करा, असे राज्यातील विरोधक म्हणत होते. परंतु त्या योजना आम्ही सुरूच ठेवल्या आहेत. हे सरकार सर्वसामान्यांचे आहे. शेतक-यांचे आहे. म्हणून आजपासून लाडकाशेतकरी ही योजना राबवू, ई-पीक पाहणीऐवजी सातबारावर पिकांची नोंद आहे त्या सगळ्यांना मदत देण्याचा निर्णय आपण घेत आहोतअशी घोषणा राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी परळीत बुधवारी राज्यस्तरीय कृषी महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना केली.

### प्रत्येक वर्षाला शेतक-यांना मिळणार १२ हजार रुपये

केंद्र सरकार देशभरात पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजना राबवत आहे. या योजनेअंतर्गत शेतकरी कुटुंबाला दरवर्षी ६ हजार रुपये इतकी आर्थिक मदत दिली जाते. दर ४ महिन्यांच्या अंतराने २ हजार रुपयांचा हप्ता शेतक-यांच्या खात्यावर जमा केला जातो. अशाच प्रकारची योजना महाराष्ट्र सरकारने देखील सुरू केली आहे. नमो शेतकरी महासन्मान निधी योजना राज्य सरकारने सुरू केली आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्य सरकारने केंद्र सरकारच्या ६ हजार रुपयांमध्ये आणखी ६ हजार रुपयांची भर घातली आहे. त्यामुळे राज्यातील शेतक-यांना प्रतिवर्ष १२ हजार रुपये मिळणार आहेत.

# 'लाडकी बहीण योजना' बंद तर होणारच नाही, भविष्यात दरमहा रकमेत वाढ करू-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे




**कोल्हापूर, दि.२२: 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेमुळे महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला अधिक बळकटी मिळत आहे. ही योजना बंद तर होणारच नाही उलट भविष्यात या योजनेतील मिळणा-या दरमहा रकमेत वाढ करू, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.**

कोल्हापूर येथील 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजना वचनपूर्ती सोहळा कार्यक्रमात जिल्ह्यातील हजारो महिलांच्या उपस्थितीत कार्यक्रम झाला. त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य मंत्री तथा पालकमंत्री हसन मुश्रीफ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद पुणेचे उपाध्यक्ष प्रकाश आबिटकर, खासदार धनंजय महाडिक, धैर्यशील माने, आमदार सदाभाऊ खोत, आमदार प्रकाश आवाडे, आमदार राजेंद्र पाटील-यड्रावकर, आमदार राजेश पाटील, पुणे महसूल विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, कोल्हापूर परिक्षेत्रचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी अमोल येडगे, कोल्हापूर महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त के. मंजुलक्ष्मी, जिल्हा परिषद प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस., पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित, इचलकरंजी महानगरपालिका प्रशासक तथा आयुक्त ओमप्रकाश दिवटे उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, कल्याणकारी योजनांची सांगड घालून विकासकामे केली जात आहेत. लाडकी बहीण योजना सर्वसामान्य महिलांसाठी सुरू करण्यात आली आहे. लोकप्रिय अशा या योजनेत राज्यात १ कोटी ४० लाखांहून अधिक महिलांनी सहभाग नोंदविला. यातील १ कोटी १० लाखांहून अधिक महिलांना दोन महिन्यांचे पैसेही वितरीत करण्यात आले. सर्वसामान्य महिला आपल्या जीवनात करीत असलेल्या काटकसरीमध्ये दैनंदिन खर्चासाठी हे हक्काचे पैसे महत्त्वाचे ठरत आहेत. यातून महिला अर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यास सुरूवात झाली आहे. आता त्यांना घरात पैसे मागण्याची गरज राहणार नाही.

मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले की, 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेतून हस्तांतरित केलेला आर्थिक लाभ कोणत्याही थकित कर्जाच्या बदल्यात समायोजित केला जाऊ नये. यासाठी खात्यातून पैसे परस्पर न काढण्याबाबत सर्व बँकांना कडक निर्देश दिले. महिला सक्षमीकरणासह त्यांच्या सुरक्षेसाठीही प्राधान्य देण्यात येत आहे. तसेच कोल्हापूरसाठी खंडपीठ होण्यासाठी लवकरच निर्णय घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. तत्पूर्वी राज्यात कोल्हापूर जिल्ह्यातून सर्वात जास्त बहिणींनी अर्ज केल्याबद्दल मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी उपस्थित महिलांना धन्यवाद दिले. कार्यक्रमाची सुरुवात महाराणी ताराबाई, राजमाता जिजाऊ, रमाबाई भीमराव आंबेडकर, सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करुन झाली.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, देशात असलेल्या ५० टक्के महिला आर्थिक सक्षम होवून त्या अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात आल्या, तरच देश विकसित होवू शकेल. महिलांना अर्थिक सक्षम करण्यासाठी 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेचा लाभ राज्यातील १ कोटी १० लाखांहून अधिक महिलांना दिला आहे. तसेच सप्टेंबरअखेर अडीच कोटी महिलांच्या खात्यामध्ये पैसे जमा होतील यासाठी शासनाकडून प्रतिवर्षी अर्थसंकल्पात भरीव तरतूद केली जाणार आहे. शासन राज्यातील कष्टकरी, शोषित, वंचित तसेच शेतक-यांच्या पाठीशी भक्कमपणाने उभे राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले की, या योजनेबाबत राज्यातील महिलांच्या विासाला पात्र ठरण्याचा शासनाने प्रयत्न केला आहे. विकासापासून वंचित असणा-या शेवटच्या घटकालाही मुख्य प्रवाहात आणण्याचे काम शासन करीत असून ख-या अर्थाने शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचाराने हे शासन वाटचाल करीत आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यटनस्थळांचा विकास तसेच पंचगंगा नदीचा पूर कायमस्वरूपी टाळण्यासाठी राज्य सरकारने अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही देवून राज्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी काटेकोर अंमलबजावणीसाठी शासन तत्पर असल्याचे त्यांनी सांगितले.

कोल्हापूर जिल्ह्याने राज्याला भरपूर दिले असून ख-या अर्थाने पुरोगामी चळवळीला बळ दिले. या जिल्ह्यात महिलांच्या बचतगटाची चळवळ सक्षमपणाने उभी राहिली. राज्यात सर्व क्षेत्रात महिला आघाडीवर असल्याचे सांगून शासन महिला-भगिनींच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे पालकमंत्री श्री. मुश्रीफ यांनी प्रास्ताविकामध्ये सांगितले. तर उद्योग मंत्री श्री.सामंत यांनी राज्यातील महिलांना बळ देणे ही शासनाची जबाबदारी असून देशाला महासत्ता बनविण्यासाठी महाराष्ट्रातील महिलांचे मोठे योगदान राहणार असल्याचे प्रतिपादन केले.

यावेळी 'मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण' या योजनेतील १० महिला लाभार्थी, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील ६ लाभार्थी, तसेच मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात उत्कृष्ट कार्य केलेल्या ५ अंगणवाडी सेविकांचा प्रातिनिधीक स्वरूपात मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.

# मै रहूँ ना रहूँ भारत रहना चाहिए... देश रंगिला रंगिला... सुनो गौरसे ... जय हो... ! ह्या देशभक्तीगीत धमाल नृत्याने स्वातंत्र्यदिन साजरा

## सहाय्यक जिल्हाधिकारी कावलि मेघना यांनी केले ध्वजवंदन

**लोकादेश न्यूज, किनवट : येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयात मुख्य शासकीय समारोहात भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ७७ व्या वर्धापन दिनानिमित्त राष्ट्रध्वज वंदन कार्यक्रम हर्षोल्लासात साजरा झाला. सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्पाधिकारी कावली मेघना,भाप्रसे यांनी यावेळी झेंडावंदन केले.**

याप्रसंगी आमदार भीमराव केराम, तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर, गटविकास अधिकारी पुरुषोत्तम वैष्णव, पीएम पोषण योजना अधिक्षक अनिल महामुने, नगर परिषदेचे मुख्याधिकारी मुगाजी काकडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

उत्तम कानिंदे यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले व उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रमाची जनजागृती केली. संगीत विशारद प्रा.आम्रपाली वाठोरे व तबला विशारद प्रा. शिवकुमार कोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली शर्वरी गिरीश पत्की, इशिता गिरीश पत्की, पद्मश्री श्रीराम वळसंगकर, धनश्री श्रीराम वळसंगकर, वंशिका रामकृष्ण केंद्रे, ऋचा रमाकांत चक्रावार व आकांक्षा प्रदीप कांबळे यांनी राष्ट्रगीत, राज्य गीत व मेरे वतन मेरी जान है तू हे देशभक्ती गीत सादर केले. त्यानंतर राष्ट्रीय कोच संदीप यशिमोड



यांच्या मार्गदर्शनाखाली लक्ष्मीबाई सेवाभावी संस्था व सेल्फ डिफेन्स शोटोकॉन कराटे असोसिएशन नांदेड यांच्या विद्यार्थ्यांनी स्वसंरक्षणार्थ कराटे प्रात्यक्षिक सादर केले.

प्राचार्य एस. व्ही. रमणराव यांच्या मार्गदर्शनाखाली मातोश्री कमलताई ठमके इंग्लिश मीडियम स्कूल कोठारी (चि.) येथील नामांकित शाळेत प्रवेश योजनेतील आदिवासी मुलींनी देश रंगीला रंगीला या गीतावर फ्रीस्टाईल नृत्य व मै रहूँ या ना रहूँ भारत रहना चाहिए या गीतावर सेमी क्लासिकल नृत्य सादर करून सर्वांची मने जिंकली.

बबिता भंडारे यांच्या मार्गदर्शनाखाली सरस्वती विद्यामंदिर प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी सुनो गौर से दुनियावालो.. या गीतावर नृत्य व जय हो.. या गीतावर डंबेल्स नृत्य सादर केले. निलेश भिलवडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुमतीबाई हेमसिंग नाईक कन्या माध्यमिक विद्यालय किनवट येथील विद्यार्थिनींनी वृक्षारोपनाचा संदेश देणारी नुक्कड नाटीका सादर केली. लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत स्वीप कक्ष मतदार जनजागृती पथकातील शाहीर नरेंद्र दोराटे, हिरामण जाधव,केशव केंद्रे व ढोलकी वादक साहेबराव वाढवे यांना प्रशस्तीपत्र देऊन व स्वातंत्र्यसैनिकांच्या वारस मुक्ताबाई निवृत्ती सावते यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास जिल्हा नियोजन समिती सदस्य तथा माजी नगराध्यक्ष हाजी ईसाखान सरदारखान, माजी नगराध्यक्ष के मूर्ती, आनंद मच्छेवार, अनिल तिरमनवार, समाजसेवक डॉ. अशोक बेलखोडे, माजी सभापती सोपानराव केंद्रे, माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेम्मानीवार, सामाजिक कार्यकर्ते अशोक नेम्मानीवार, निवृत्त तहसीलदार उत्तमराव कागणे, नायब तहसिलदार विकास राठोड, आकाश जाधव, पत्रकार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, स्वातंत्र्यसैनिक वारस, माजी सैनिक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नायब तहसीलदार रामेश्वर मुंडे, अव्वल कारकून कैलास कांबळे, राम बुसमवार, महसूल सहायक नामदेव धोंड, संतोष मुपडे, मंडळ अधिकारी मंगेश वांगीकर, तलाठी सचिन भालेराव, शिवकांता होनवडजकर, अमोल वाघाडे, वन हक्क व्यवस्थापक महेश राठोड, संगणक चालक कविराज येरेकर, शिपाई खंडेराव मॅकलवार, संतोष खंदारे, संदीप पुरके , कल्पना वाळके , हनुमंत दडांजे, चालक मनोज मगरे आदींनी परिश्रम घेतले.

**विविध ठिकाणी ध्वजवंदन**

येथील तहसील कार्यालयात व नगर परिषदेत तहसीलदार डॉ.शारदा चौंडेकर, पंचायत समितीत गट विकास अधिकारी पुरुषोत्तम वैष्णव, गट शिक्षणाधिकारी कार्यालयात पीएम पोषण शक्ती निर्माण योजना अधिक्षक अनिल महामुने यांनी ध्वजवंदन केले.

# पीएम- किसान आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजना

## राज्यातील शेतक-यांच्या खात्यात ३६ हजार ८१६ कोटी ८५ लाख रुपये जमा

देशासह राज्याची अर्थव्यवस्था शेतक-यांवर अवलंबून आहे. शेतकरी सशक्त आणि बळकट झाले पाहिजेत हीच केंद्र व राज्य शासनाची भूमिका आहे. याच भूमिकेतून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शेतक-यांसाठी पीएम किसान, तर राज्य शासनाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमख्यमंत्री अजित पवार आणि कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली नमो शेतकरी महासन्मान योजना सुरु केली. यामुळे राज्य शासन शेतक्यांच्या पाठिशी भक्कमपणे उभे असल्याचा संदेश दिला आहे.

शेतक-यांच्या उत्पन्नात वाढ करून त्यांचे आर्थिक सक्षमीकरण करण्याकरिता केंद्र शासनाच्यावतीने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना आणि राज्य शासनाच्यावतीने नमो शेतकरी महासन्मान निधी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत राज्यातील पात्र शेतक-यांच्या खात्यात एकूण ३६ हजार ८१६ कोटी ८५ लाख रुपये जमा करण्यात आले आहेत.

अल्प व अत्यल्प भूधारक शेतक-यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी केंद्र शासनाच्यावतीने सुरू केलेली प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजना राज्यात १ डिसेंबर २०१८ पासून राबविण्यास मान्यता देण्यात आली. त्याला जोड म्हणून राज्य शासनानेही ३० मे २०२३ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत नमो शेतकरी महासन्मान निधी योजना राबविण्यास मान्यता देऊन त्याप्रमाणे योजनेची सुरुवात केली. या दोन्ही योजनांचे मिळून राज्यातील शेतक-यांच्या खात्यात एकूण ३६ हजार ८१६ कोटी ८५ लाख रुपये जमा झाले आहेत.

**लाभार्थी पात्रतेचे निकष**

ज्यांच्या नावे भूमी अभिलेखामध्ये वहितीलायक क्षेत्र आहे अशी सर्व शेतकरी कुटुंबे या योजनेचा लाभ घेण्यास पात्र असून अशा पात्र शेतकरी कुटुंबियांस दोन हजार रुपये प्रती हप्ता याप्रमाणे तीन हप्त्यात एकूण सहा हजार रुपये प्रतीवर्षी लाभ देण्यात येतो. पात्र शेतक्यांना लाभाची गणना केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार करण्यात येते.

**लाभ मिळण्यास अपात्र व्यक्ती**

या योजनेकरीता जमीन धारण करणारी संस्था, संवैधानिक पद धारण करणारे किंवा केलेले आजी माजी मंत्री, राज्यमंत्री, खासदार, राज्यसभा सदस्य,




विधानसभा, विधानपरिषद सदस्य, महापौर, जि. प. अध्यक्ष तसेच केंद्र व राज्य शासनाचे सर्व कार्यरत व निवृत्त अधिकारी, कर्मचारी, शासन अंगीकृत निमशासकीय संस्थेच्या अखत्यारितील कार्यालयातील आणि स्वायत्त संस्थांचे तसेच स्थानिक स्वराज संस्थांमधील नियमित अधिकारी, कर्मचारी, मागील वर्षी आयकर भरलेली व्यक्ती, ज्यांचे मासिक निवृत्तीवेतन १० हजार रुपये किंवा त्यापेक्षा अधिक असणारे निवृत्तीवेतनधारक, नोंदणीकृत व्यवसायिक डॉक्टर, वकील, अभियंता, सनदी लेखापाल, वास्तुशास्त्रज्ञ आदी क्षेत्रातील व्यक्ती लाभ मिळण्यास अपात्र आहेत.

**शेतक-यांच्या खात्यात ३१ हजार ५११ कोटी ९० लाख रुपये जमा**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत राज्यात ११६.६५ लाख शेतकरी कुटुंब पात्र आहेत. त्यांच्या बँक खात्यात एकूण सतरा हफ्ते मध्ये आजपर्यंत ३१ हजार ५११ कोटी ९० लाख रुपयांचा लाभ जमा करण्यात आला आहे.

**पीएम-किसानला राज्य शासनाच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेची जोड**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्याचा आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजना राबविण्याचा निर्णय ३० मे २०२३ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

अन्नदाता बळीराजाच्या उत्पन्नवाढीसाठी प्रधानमंत्री कृषी सन्मान निधी योजनेत राज्य शासनाच्या अनुदानाची भर घालणारी नमो शेतकरी महासन्मान निधी ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेतून प्रति वर्ष रक्कम सहा हजार रुपये लाभ दर चार महिन्यांनी दोन हजार रुपये अशा वार्षिक समान तीन हप्त्यात पात्र लाभार्थीच्या बँक खात्यात जमा करण्यात येत आहेत. पहिला हप्ता एप्रिल ते जुलै, दुसरा हप्ता ऑगस्ट ते नोव्हेंबर आणि तिसरा हप्ता डिसेंबर ते मार्च यप्रमाणे दोन हजार रुपये जमा करण्यात येत आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेत पी.एम. किसान पोर्टलवर नोंदणी करणे, पात्र शेतक-यांना मान्यता देण्यासंदर्भात कार्यपद्धतीत सुधारणा करण्यात आली आहे. संनियंत्रणासाठी ग्राम, तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरीय समित्या गठीत करण्यात आल्या आहेत.

**नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेतून ५ हजार ३०४ कोटी ९५ लाख रुपयांचा लाभ**

राज्यात या योजनेअंतर्गत ई-केवायसी, आधार संलग्न व भूमी अभिलेख नोंदी आदी सर्व बाबीची पूर्तता करण्यात आली असून १३ ऑगस्ट २०२४ पर्यंत एकूण ९१.९३ लाख शेतकरी कुटुंब पात्र आहेत. एकूण तीन हफ्ते मध्ये त्यांच्या बँक खात्यात नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेतून एकूण पाच हजार ३०४ कोटी ९५ लाख रुपये जमा करण्यात आले आहेत.

# महिलांच्या आरोग्य सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना

फार पूर्वीपासून चुलीवर स्वयंपाक करण्याची पध्दत होती व अजूनही काही ठिकाणी आहे. यासाठी जंगलातील, रानातील लाकूड-फाटा गोळा करुन किंवा वृक्षतोड करुन इंधनाची व्यवस्था केली जाते. यातून महिलांना धुरांचा खूप त्रास होवून अनेक आरोग्याबाबतच्या समस्यांना सामोरे जावे लागते. या सर्व समस्यांपासून महिलांची सुटका व्हावी. तसेच इंधनासाठी त्यांना वणवण भटकावे लागू नये यासाठी शासनाने यापूर्वीही अनेक योजना अंमलात आणल्या आहेत. महिलांच्या आरोग्यमानात सुधारणा होऊन त्यांचे सक्षमीकरण करण्यासाठी केंद्र शासनाने प्रधानमंत्री उज्ज्वला योजना सन २०१६ पासून सुरु केली आहे. या योजनेत महाराष्ट्रातील पात्र कुटूंबाना गॅसजोडणी देण्याचे काम तेल कंपन्याच्या सहकार्याने सुरू आहे.



महाराष्ट्रात सद्यस्थितीत प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेत गॅस जोडणी घेतलेले तसेच, या योजनेच्या व्यतिरिक्त अन्य गरीब प्रवर्गातील गॅस जोडण्या असलेल्या काही लाभार्थ्यांना बाजार दराने गॅस जोडण्यांचे पुनर्भरण करणे आर्थिकदृष्ट्या शक्य होत नाही. तसेच एक सिलेंडर संपल्यानंतर दुसरे सिलेंडर उपलब्ध होईपर्यत स्वयंपाकासाठी साधन उपलब्ध नसल्यामुळे वृक्षतोड करून पर्यावरणाला हानी पोहोचण्यात येते. ही बाब विचारात घेऊन राज्य शासनाने मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेची घोषणा ३० जुलै २०२४ रोजी केली. या योजनेत राज्यातील केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या सुमारे ५२.१६ लक्ष लाभार्थ्यांना तसेच मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेच्या पात्र लाभार्थ्यांच्या कुटूंबाला वार्षिक ३ गॅस सिलेंडरचे पुनर्भरण मोफत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने या योजनेत लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी ई-केवायसी करुन घेणे बंधनकारक आहे. विषेशतः उज्ज्वला गॅस जोडणी व मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील महिला लाभार्थ्यांनी ई-केवायसी करुन घ्यावी. त्यासाठी संबंधित तेल कंपनीचे प्रतिनिधी गावात येऊन ई-केवायसी करुन घेतील किंवा लाभार्थ्यांनी शक्य असल्यास संबंधित ऑईल कंपनीच्या एजन्सीमध्ये जाऊन ई-केवायसी करुन घ्यावी. सर्व लाभार्थ्यांनी ई-केवायसी केल्याशिवाय त्यांना या योजनेचा मिळणार नाही. यामुळे शासनाच्या मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनाचा लाभ घेण्यासाठी ई-केवायसी करणे बंधनकारक आहे.

**लाभार्थ्यांची पात्रता:-** या योजनेचा लाभ मिळण्यासाठी गॅस जोडणी महिलेच्या नावाने असणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत राज्यात प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेंतर्गत पात्र असलेले सुमारे ५२.१६ लक्ष लाभार्थी या योजनेसाठी पात्र असणार आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेस पात्र असलेल्या लाभार्थ्यांचे कुटूंब या योजनेस पात्र असणार आहे. एका कुटूंबात रेशन कार्डनुसार केवळ एक लाभार्थी या योजनेस पात्र राहील. हा लाभ केवळ १४.२ कि.ग्रॅ. वजनाच्या गॅस सिलेंडरची जोडणी असलेल्या गॅसधारकांना अनुज्ञेय असणार आहे.

**प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांसाठी कार्यपध्दती :-**

प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना गॅस सिलेंडरचे नियमित वितरण हे तेल कंपन्या मार्फत करण्यात येते. राज्य शासनाच्या मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजनेंतर्गत द्यावयाच्या ३ मोफत सिलेंडरचे वितरणही तेल कंपन्या मार्फत करण्यात येईल. सद्यस्थितीत प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेंतर्गत वितरीत होणा-या गॅस सिलेंडरची बाजारभावाची संपूर्ण रक्कम सरासरी ८३० रुपये ग्राहकांकडून घेतली जाते. तदनंतर केंद्र शासनाकडून प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेंतर्गत देण्यात येणारी ३०० रुपये सबसिडी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते. त्याच धर्तीवर तेल कंपन्यांनी राज्य शासनाकडून द्यावयाची अंदाजे ५३० रुपये प्रति सिलेंडर, इतकी रक्कम ग्राहकांच्या बँक खात्यामध्ये जमा करावी. तेल कंपन्यांकडून राज्य शासनाच्या योजनेचा लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची यादी कंपन्या त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करतील. तसेच, लाभार्थ्यांची माहिती दर आठवड्याला शासनास उपलब्ध करुन देतील. या योजनेत ग्राहकास एका महिन्यात एकापेक्षा अधिक सिलेंडरसाठी सबसिडी देण्यात येणार नाही. जिल्हानिहाय सिलिंडरच्या किंमतीत फरक आहे. अंतिमतः तेल कंपन्याकडून वितरीत करण्यात आलेल्या सिलेंडरच्या किंमतीच्या आधारावर, तसेच जिल्हानिहाय सिलेंडरच्या किंमतीच्या आधारावर, प्रत्यक्ष खर्च झालेली रक्कम तेल कंपन्यांना अदा करण्यात येईल.

**मुख्यमंत्री माझी-लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांसाठी कार्यपध्दती**

राज्य शासनाच्या मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेंतर्गत द्यावयाच्या ३ मोफत सिलेंडरचे वितरण तेल कंपन्या मार्फत करण्यात येईल. या योजनेत ग्राहकास एका महिन्यात एकापेक्षा अधिक सिलेंडरसाठी सबसिडी देण्यात येणार नाही. जिल्ह्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत पुरवठा यंत्रणा कार्यरत आहे. तसेच या योजनेत प्रत्येक जिल्ह्यात जिल्हास्तरावर एक समिती गठीत केली जाणार आहे. या समितीचे अध्यक्ष संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी/अप्पर जिल्हाधिकारी तर सदस्य सचिव म्हणून जिल्हा पुरवठा अधिकारी असणार आहेत.

**-अलका पाटील,** उपसंपादक, जिल्हा माहिती कार्यालय, नांदेड

# महाराष्ट्रात २५ लाख 'लखपती दीदी' बनविण्याचे उद्दिष्ट पूर्णत्वास नेणार

**जळगाव येथे २५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता राज्यातील 'लखपती दीदी सम्मेलन' तसेच समुदाय संसाधन व्यक्तींचा सन्मान सोहळा होणार आहे.या दिवशी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते देशभरातील स्वयंसहाय्यता गटांना २५०० कोटी रुपयांचा फिरता निधी व ५००० कोटींचे बँक अर्थसहाय्य वितरणाचाहा कार्यक्रम होणार आहे. ग्रामीण विकास मंत्रालय,भारत सरकार, ग्रामविकास व पंचायतराज विभाग महाराष्ट्र शासन उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोनती अभियानाअंतर्गत हा कार्यक्रम होणार आहे त्यानिमित्ताने हा लेख...**




**उमेद-** अर्थातच महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान हे ग्राम विकास व पंचायतराज विभाग अंतर्गत महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या आत्मनिर्भर बनवून त्यांना स्वतः ची ओळख निर्माण करून देणारे, तसेच नवे क्षितिज, नवा विाास निर्माण करून देणारे ग्रामीण महिलांच्या हक्काचे व्यासपीठ होय !

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार देशभरातील कोट्यावधी लखपती दीदी निर्माण करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या ध्येयाकडे एक पाऊल म्हणून महाराष्ट्रात २५ लाख लखपती दीदी बनण्याचे कार्य पूर्णत्वास जात आहे. लखपती दीदींचे वार्षिक उत्पन्न किमान एक लाखापेक्षा जास्त होण्यासाठी त्यांना दोन किंवा दोनपेक्षा अधिक व्यवसाय संधी निर्माण करून दिल्या जाणार आहेत. अभियानातील महिलांना बँकेचे व्यवहार शिकविले जातात त्यांना आर्थिक साक्षर केले जाते. कृषीविषयक माहितीसाठी अभियानात कृषीसखी आहेत, बँकविषयक मदतीसाठी बँक सखी, अशा विविध क्षेत्रात प्रशिक्षित समुदाय संसाधन व्यक्ती अभियानात आहेत. तसेच मोठ्या प्रमाणावर कर्ज उपलब्धीसाठी अनेक राष्ट्रीयीकृत बँकाकडून कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून दिले जाते. उमेद अभियानात २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात एकूण ८ हजार ९७४ कोटी रुपये कर्ज वितरण करण्यात आले असून आज पर्यंतच्या इतिहासातील हे सर्वात मोठे कर्ज म्हणून देखील गणले गेले आहे.

ग्रामीण भारतातील गरिबीच्या निर्मूलनासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची सुरुवात सन २०११ मध्ये केली. अभियानामध्ये ग्रामीण महाराष्ट्रातील गरीब व जोखीम प्रवण कुटुंबांना समृद्ध, आत्मसन्मानाने व सुरक्षित जीवन जगता यावे, यासाठी त्यांच्या सर्वसमावेशक, लोकशाही तत्वावर आधारित स्वयंचलित समुदाय संस्थांची निर्मिती करुन त्यांचे अधिकार व हक्क, विविध वित्तीय सेवा, तसेच शाात उपजीविकेच्या संधी प्राप्त होण्याच्या दृष्टीने पोषक वातावरणाची निर्मिती करण्यासाठी उमेद मार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत.

उमेद अभियानाच्या या महिला सक्षमीकरणाच्या चळवळीमध्ये आज महाराष्ट्रातील ३४ जिल्हे ३५१ तालुक्यातील जवळपास ६६ लाख कुटुंब सहभागी आहेत. अभियानात आतापर्यंत ६ लाख ४० हजार महिला स्वयं सहाय्यता समूह स्थापन झालेले आहेत. यातील १ लाख २५ हजारापेक्षा जास्त गट हे मागील दोन वर्षात स्थापन झालेले आहेत. ३१,८१२ ग्रामसंघ, १,८७५ प्रभागसंघ, १० हजार ८३ उत्पादक गट आणि ४१० पेक्षाही जास्त शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन झालेल्या आहेत. या संस्थांच्या दैनंदिन सुलभीकरणासाठी गावस्तरावर प्रशिक्षित समुदाय संसाधन व्यक्तींची फळी निर्माण करण्यात आलेली आहे.

उमेद अभियानामार्फत महिलांनी रोजगार कसा करावा? कोणता करावा, याचे प्रशिक्षण आरसेटी मधून आणि कृषी विज्ञान केंद्र व यासारख्याच विविध तज्ज्ञ संस्थामार्फत प्रशिक्षण दिले जाते. त्यासाठी ग्रामस्तरापासून राज्यस्तरापर्यंत प्रशिक्षण कार्यशाळा व प्रशिक्षण वर्ग चालविले जातात. RSETI चे प्रत्येक जिल्ह्यात असणा-या प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण महिलांचे कौशल्य वाढविण्याचे कार्य अविरतपणे सुरु आहे. राज्यात १३ लाख पेक्षा अधिक महिला 'लखपती दीदी' बनल्या आहेत.

व्यवसाय वृद्धीसाठी उमेद अभियानामार्फत विविध प्रकारचे प्रदर्शन स्थानिक पातळीवर भरवून उद्योगांना हक्काची बाजारपेठ तयार करून दिली जाते. तसेच विविधस्तरावर महालक्ष्मी सरस सारखे प्रदर्शन भरवून ग्रामीण महिलांच्या उद्योगांना जागतिक बाजारपेठ निर्माण करून दिली जाते. त्याचप्रमाणे ग्रामीण महिलांची उत्पादने ग्राहकांना आपल्या घरापर्यंत उपलब्ध व्हावीत यासाठी umedmart.com हे ई-कॉमर्स पोर्टल सुद्धा सुरु करण्यात आले आहे.

उमेद अभियानाची ग्रामीण महिलांच्या जीवनात परिवर्तन घडविण्याची चळवळ आता जोर धरत आहे आणि हे बदल दृश्य स्वरूपात दिसत आहेत. ज्या ग्रामीण भागातील महिला केवळ घर, चूल, मूल यापुरत्या मर्यादित होत्या अशा असंख्य महिला आज अनेक मोठ्या व्यासपीठावर आत्मविाासाने आपली मते मांडताना दिसत आहेत. तसेच अनेक महिला या स्वतःच्या पायावर सक्षमपणे उभा राहून गावाच्या आर्थिक विकासात सुद्धा योगदान देताना दिसत आहेत. डोंगराळ भाग असो की अतिदुर्गम भाग अशा प्रत्येक ठिकाणी आज उमेद अभियानाची महिला स्वतःच्या कर्तृत्वाचा ठसा निर्माण करत आहे.

उमेद अभियानाच्या महिला आता मसाले, पापड, लोणचे यांच्यासह अनेक खाद्य पदार्थांची निर्मिती करीत आहेत. याशिवाय हस्तकला, कपडे, शोभेच्या वस्तू, शिल्पकलेच्या वस्तू, खेळणी, मातीची भांडी यासारखे अनेक उत्पादने महिला घेत आहेत. राज्यात आज घडीला ग्रामीण महिलांचे शेती आधारित ३८ लाखापेक्षा जास्त उद्योग व्यवसाय सुरु आहेत आणि बिगर कृषी आधारित सुद्धा ७ लाख ५६ हजार व्यवसाय सुरु आहेत. येणा-या काळात आमच्या ग्रामीण भागातील महिलांचे संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्वाचा घटक असणार आहेत.

प्रत्येक गावातील कुटुंबाचा सर्वांगीण विकास साधावा त्याचबरोबर दारिद्र्य निर्मुलनासाठी शासन अनेक योजना राबवत आहे. यासाठी ग्रामीण भागाची प्रगती दारिद्र्य निर्मुलानातून झाल्याशिवाय अशक्य असल्याचे लक्षात आल्यामुळेच केंद्रसरकारने देशभर दिनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय ग्रामीण अजिविका मिशन हा ध्वजांकित कार्यक्रम सुरु केलेला आहे. महाराष्ट्रात सुद्धा हा कार्यक्रम महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान नावाने राबविला जात आहे. उमेद अभियान नावाने गावागावात या कार्यक्रमाची ओळख आहे. या अभियानाने व्यापक चळवळीचे स्वरूप धारण केलेले आहे. प्रगतीचा आणि स्वावलंबनाचा मार्ग स्विकारून,रोजगार अन स्वयं रोजगाराच्या नव्या वाटा शोधून उत्तुंग भरारी घेण्यासाठी ग्रामीण महिला सुद्धा आता सर्व क्षेत्रात अग्रेसर दिसत आहेत. महाराष्ट्रातील सर्व ग्रामीण महिलांच्या आयुष्यात सुख, समाधान आणि नवचैतन्य असण्यामागचे मुख्य कारण उमेद अभियान बनले आहे.

**-गिरीश महाजन,**
मंत्री, ग्राम विकास व पर्यटन, महाराष्ट्र राज्य.

# छायाचित्रण ही कला मानवी जीवन समृध्द करीत असते-विजय होकर्णे



**लोकादेश न्यूज, माहूर : आपल्या देशातला निसर्ग हा केवळ विराटच नाही तर अदभूतआहे. निसर्ग टिपण्यासाठी फक्त एक कलात्मक दृष्टी असावी लागते आणि हातात एक अद्ययावत कॅमेरा असावा लागतो. छायाचित्रकारासाठी निसर्गाने भरभरून दान दिले आहे.**

**पशुपक्षी, लतावेली, नदीनाले, झरे सागर हे पर्यटनातील संजीवक घटक आहेत एकूणच छायाचित्रण ही कला मानवी जीवन समृद्ध करीत असते असे प्रतिपादन छायाचित्रकार विजय होकर्णे यांनी केले.**

जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाने आयोजित केलेल्या छायाचित्रण : एक संजीवक कला या व्याख्यान प्रसंगी ते बोलत होते कार्यक्रम अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष जयकुमार गोपी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून साहित्य परिषद शाखा नांदेडचे अध्यक्ष प्रभाकर कानडखोडकर प्रसिद्ध साहित्यिक देविदास फुलारी आणि पत्रकार शंतनु डोईफोडे जळगाव येथील छायाचित्रकार सुरेश सानप उपस्थित होते. प्रारंभी संस्थेचे सचिव ड विजयकुमार भोपी यांनी प्रास्ताविक केले.

शिकारी लेखक राजे मधुकरराव देशमुख यांचे पुण्यस्मरण आणि जागतिक छायाचित्र दिनाचे औचित्य साधून माहूर येथील जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने या व्याख्यानाचे आयोजन केलेले होते.

पुढे बोलताना विजय होकर्णे म्हणाले एखादा परीस नकळतपणे हाती लागावा तसे एखादे छायाचित्र आपल्याही नकळतपणे आपण टिपतो मग असे नितांत सुंदर छायाचित्र एकाच वेळी नवनिर्मितीचे आणि कलेचे दर्शन घडविणारे ठरते हा अनुभव मात्र शब्दातीत असतो.

छायाचित्रामुळे नांदेडच्या सांस्कृतिक क्षेत्रातील विकासाला मिळणारी चालना चित्रबद्ध करता आली.नांदेड जिल्ह्यातील ऐतिहासिक स्थळ होट्टल , शंकतिर्थ, राहेर नृसिंह जुन्या व ऐतिहासिक स्थळाच्या छायाचित्राचे सादरीकरण केले.

छायाचित्रकार हा एका अर्थाने जीवनाचा भाष्यकार संशोधक आणि अध्यापकही असतो कारण वर्तमानाचे वास्तव तो जगासमोर मांडत असतो तो नव्या विचारांच्या वाटाही रसिकांना दाखवत असतो असे सांगुन आपल्या दीड तासाच्या व्याख्यानात विजय होकर्णे यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. प्रोजेक्टरच्या साह्याने आपल्या तासभराच्या व्याख्यानात होकर्णे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि कैलासस्पर्श , सुगरण पक्षी ,शेकरू यांची माहीती काही छायाचित्रे ध्वनिफिती त्यांनी दाखवल्या त्यांच्या कैलास स्पर्श या ध्वनिचित्र फितीला विद्यार्थ्यांनी प्रचंड प्रतिसाद दिला.सर्वोत्तम छायाचित्राच्या सादरीकरणातुन क्रिएटिव्हिटी आणि कला यांचे एकाच वेळी उत्तम दर्शन होकर्णे घडविले, आदर्श आणि परिपूर्ण छायाचित्र आदर्श छायाचित्र कसे असावे ते कसे काढावे त्यासाठी कसा विचार करावा संधी कशी घ्यावी यासंबंधी ही माहिती त्यांनी देवुन , छायाचित्रकारा समोरील आव्हाने छायाचित्रकाराला येणा-या अडचणी करावा लागणारा सामना संकटे आणि शेवटी छायाचित्रकाराला मिळणारे समाधान छायाचित्रांचे मानवी जीवनातील स्थान स्पष्ट केले.

**छायाचित्रण :** एक संजीवक कला या व्साख्यानासाठी माहूर परिसरातील विद्यार्थी अद्यापक आणि रसिक उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रा.विश्वास जाधव यांनी मानले.

# थोडक्यात

## जम्मू-काश्मिर आणि हरियाणा राज्यातील विधानसभा निवडणूक जाहीर



**नवी दिल्ली - जम्मू काश्मीर आणि हरियाणा या दोन राज्यांमध्ये विधानसभेच्या निवडणुका जाहीर करण्यात आल्या आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगाचे आयुक्त राजीव कुमार यांनी शुक्रवारी यासंदर्भात पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली. जम्मू काश्मीर येथे विधानसभेची निवडणूक १८ सप्टेंबरपासून सुरू होणार असून तीन टप्यांत मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. तर, हरियाणा येथे १ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे.**

जम्मू काश्मीरमध्ये तीन टप्प्यांत मतदान प्रक्रिया पार पडणार असून १२ ऑगस्टपासून निवडणूक कार्यक्रम सुरू होईल. त्यानुसार पहिल्या टप्प्यातील निवडणुकीची अधिसूचना १२ ऑगस्ट रोजी निघेल. तर, १८ सप्टेंबरला पहिल्या टप्प्यांत, २५ सप्टेंबरला दुस-या टप्प्यात तर, १ ऑक्टोबरला तिस-या टप्प्यात मतदान प्रक्रिया पार पडेल. ४ ऑक्टोबरला मतमोजणी होईल. तर, हरियाणात १ ऑक्टोबरला मतदान प्रक्रिया होऊन ४ ऑक्टोबरला मतमोजणी होणार आहे. केंद्रशासित प्रदेशातील विधानसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर करण्यापूर्वी मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार म्हणाले की, जम्मू-काश्मीरमधील लोकांना त्यांचे नशीब बदलायचे आहे. मतदार मोठ्या संख्येने येतील आणि मतदानात महिलांचा सहभाग वाढेल असेही ते म्हणाले. जम्मू आणि काश्मीरमध्ये८७.९ लाख मतदार आहेत जे मतदानाचा हक्क बजावतील. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार म्हणाले की, संसदीय निवडणुकीनंतर जम्मू आणि काश्मीरमधील परिस्थिती बदलली आहे आणि केंद्रशासित प्रदेशात लोकशाही बळकट झाली आहे. जम्मू आणि काश्मीरमध्ये ११ हजार ८३८ मतदान केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत, ज्यात ४२.६ लाख महिलांसह ८७.०९ लाख मतदार आहेत, जे त्यांचा मतदानाचा हक्क बजावतील. हरियाणातील विधानसभा निवडणुकीच्या तारखांच्या घोषणेपूर्वी भारतीय निवडणूक आयोगाने सांगितले की, राज्यात २० हजार ६२९ मतदान केंद्रे आहेत. हरियाणात २ कोटींहून अधिक मतदार असल्याचेही निवडणूक आयोगाने म्हटले आहे.

## कोलकाता घटनेच्या निषेधार्थ किनवट येथे कँडल मार्च



**लोकदेश न्यूज, किनवट : कोलकाता येथील महिला डॉक्टरच्या बलात्कारानंतर त्यांची निर्दयीपणे हत्या केल्याच्या निषेधार्थ शुक्रवारी दि.१६ किनवटच्या गोकुंदा येथे महिलांनी कँडल मार्च काढला.**
भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांच्या सुचेनुसार व नांदेड उत्तरच्या जिल्हाध्यक्षा संध्या राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा सरचिटणीस भावना दीक्षित व इतर महिला पदाधिका-यांनी कँडल मार्चचे आयोजन केले होते.गोकुंद्याच्या दत्तनगर ते स्व.बाळासाहेब ठाकरे चौकापर्यंत काढलेल्या कँडल मार्चमध्ये जिल्हा सचिव करिश्मा भगत ,डॉ.अनुराधा उपासनी , डॉ.सौ. घडसिंह डॉ.वंदना पत्की ,डॉ. सुंकरवार, जाधव , स्वाती राव ,धावाले यांच्यासह किनवट व गोकुंदा येथील महिला,विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कँडल मार्चनंतर महिलांनी महिला डॉक्टरच्या मारेक-यांना त्वरित फासावर लटकविण्याची मागणी केली.दरम्यान,याच घटनेच्या निषेधार्थ किनवट डॉक्टर्स असोसिएशनने शनिवारी दि.१७ दवाखाने बंद ठेवून मारेक-यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी राष्ट्रपतींकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## जातीय तेढ निर्माण करणा-यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी



**लोकादेश न्यूज, किनवट : दोन धर्मियांमध्ये जाणुनबुजुन जातीय तेढ निर्माण करून धार्मिक कलह, द्वेष पसरवण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी रामगीरी गुरु नारायण गिरी महाराज, सरला बेट यांच्यावर गुन्हा दाखल करून तातडीने अटक करण्याची मागणी किनवटचे पोलीस नीरक्षक यांन निवेदन देऊन करण्यात आली आहे.** रामगीरी गुरु नारायण गिरी महाराज, सरला बेट यांनी मौजे पंचाळे, ता. सिन्नर, जि. नाशिक या ठिकाणी सप्ताहा दरम्यान प्रवचनामध्ये उपस्थित जनसमुदायासमोर जातीय तेढ निर्माण होईल असे जाणिवपूर्वक प्रवचन केले आहे. त्यांचेवर गुन्हा दाखल करण्यात यावा असे निवेदन देण्यात आले. या वेळी शेख नजीर शेख शरीफ (उर्फ बाबा भाई), अकरम चव्हाण, जावेद खान दौलत खान, असिफ मिर्झा, अकबर इसा खान, अभय नगराळे, गुड्डू पटेल, अकबर शेख, सद्दाम चाव्हण आदी उपस्थित होते.

## किनवट येथील संविधान स्तंभ नुतनीकरण व छत्रपती शिवाजी महाराजांचा आरूढ पुतळा नियोजीत जागेवर उभारण्याची मागणी



**लोकादेश न्यूज, किनवट :** किनवट शहरातील जुन्या नगर परिषदेसमोर सन १९७२-७३ साली स्वातंत्र्याला २५ वर्षे पुर्ण झाल्या निमित्याने उभारण्यात आलेला संविधान स्तंभ हे जिर्ण व मोडकळीस आल्या कारणाने सदरील संविधान स्तंभाचे सद्यास्थित ठिकाणी नुतनीकरण स्वंतंत्ररित्या शासकीय प्रक्रीयेनुसार करण्यात यावे. तसेच नगर परिषदे मार्फत छत्रपती शिवाजी महाराजांचा आरूढ पुतळा उभारण्या संबंधी जिल्हाधिकारी. नांदेड यांनी जुना पुतळा होता त्याच जागेवर मान्यता दिली आहे. परंतु नगर परिषद प्रशासनाने १४ महिण्याचा कालावधी संपून सुध्दा नियोजीत जागेवर छत्रपती शिवाजी महाराजांचा आरूढ पुतळा उभारण्या संबंधी काम सुरू केले नाही. त्यामुळे शहरातील व तालुक्यातील शिव आंबेडकरी, संविधान प्रेमी नागरीकांच्या वतीने दि. २८.०८.२०२४ पासुन संविधान स्तंभ जवळ बेमुदत साखळी उपोषण करीत आहे. न.प.प्रशासनास किनवट येथील संविधान स्तंभ नुतनीकरण व छत्रपती शिवाजी महाराजांचा आरूढ पुतळा नियोजीत जागेवर उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. या वेळी विकास कुडमेते, निखिल वाघमारे, अब्दुल्ला चाउस, शेख नजीर, राहुल कापसे, अभय नगराळे आदी उपस्थित होते.

## किनवट पं.स.चा कंत्राटी ऑपरेटर 'एसीबी' च्या जाळयात; साडेतीन हजाराची घेतली लाच

**लोकादेश न्यूज, किनवट : पंतप्रधान आवास योजनेच्या मस्टरवर कार्यवाही करण्यासाठी लाभार्थ्याकडून ३ हजार ५०० रूपयांची लाच घेणा-या किनवट पंचायत समितीमधील 'मनरेगा' च्या कंत्राटी ऑपरेटरला मंगळवारी दि.२० नांदेडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ जाळयात ओढले.**

किनवट तालुक्याच्या शिरपूर येथील ग्रामपंचायत हद्दीतील एका तक्रारदाराने 'मनरेगा'अंतर्गत पंतप्रधान आवास योजनेचे एकूण ७ मस्टर पंचायत समिती किनवट येथे सादर केले होते. सदर मस्टरवर पुढील कार्यवाही करण्यासाठी पंचायत समितीमधील कंत्राटी ऑपरेटर अविनाश भुरेवार याने तक्रारदार यांच्याकडे प्रत्येक मस्टरचे ५०० रूपये याप्रमाणे एकूण ७ मस्टरसाठी ३ हजार ५०० रूपयांची मागणी केली. सदरची रक्कम ही लाच असल्याची तक्रारदार यांना खात्री झाली.त्यानंतर त्यांनी कंत्राटी ऑपरेटर भुरेवार याच्याविरुद्ध दि.१६ ऑगस्ट रोजी नांदेडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली.
त्या तक्रारीवरून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मंगळवारी दुपारी लाच मागणीची पडताळणी केली असता,अविनाश भुरेवार याने पंचायत समिती कार्यालयात पंचासमक्ष ३ हजार ५०० रुपये लाचेची मागणी केल्याचे सिद्ध झाले. त्यावरून पथकाने त्याला रंगेहाथ पकडले.याप्रकरणी आरोपी ऑपरेटर अविनाश भुरेवार याच्याविरुद्ध किनवट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.एसीबीचे पोलीस अधीक्षक संदीप पालवे, पर्यवेक्षण अधिकारी प्रशांत पवार यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक गजानन बोडके व त्यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वी केली.

## जिल्ह्यात २८ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन




**नांदेड दि. २२ ऑगस्ट :- राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण नवी दिल्ली यांच्या आदेशान्वये महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई व नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्यातर्फे दिनांक २८ सप्टेंबर २०२४ रोजी जिल्हा न्यायालय नांदेड व जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयात तसेच कौटुंबीक न्यायालय नांदेड येथे राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या राष्ट्रीय लोकअदालतीत मोठ्या संख्येने प्रकरणात तडजोड होण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष श्रीमती सुरेखा कोसमकर व न्यायाधीश नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव श्रीमती दलजीत कौर जज यांनी केले आहे.**

या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये प्रलंबित तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, दिवाणी प्रकरणे, मोटार अपघात नुकसान भरपाईचे प्रकरणे, भुसंपादन प्रकरणे, धनादेश अनादरीत झाल्याबाबत प्रकरणे, तसेच कौटुंबिक न्यायालयातील तडजोड होण्या योग्य प्रकरणे, ग्राहक तक्रार निवारण मंच, सहकार न्यायालय व कामगार न्यायालयातील प्रकरणे इत्यादी तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत.
याशिवाय सदर लोक अदालतीत दाखलपूर्व प्रकरणे जसे थकीत मालमत्ता कर, थकीत विद्युत बिल, थकीत टेलीफोन बिल, विविध बँकांचे कर्ज वसुली प्रकरण, थकीत पाणी बिल इत्यादी प्रकरणे तडजोडीद्वारे निकाली काढण्यासाठी ठेवण्यात येणार आाहेत.
या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये झालेल्या निवाडयाविरुद्ध अपील नाही. प्रलंबीत प्रकरणात भरलेली कोर्ट फी रक्कम १०० टक्के परत मिळते. नातेसंबंधात कटुता निर्माण होत नाही. अशाप्रकारे लोकन्यायालयाच्या माध्यमातुन सुलभ, जलद व मोफत न्याय मिळतो. सर्व पक्षकारांनी येतांना आपले अधिकृत ओळखपत्र घेवून यावे. सर्व संबंधित पक्षकारांनी दिनांक २८ सप्टेंबर २०२४ रोजी होणा-या राष्ट्रीय लोकअदालतीचा लाभ घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## संजय गांधी निराधार व श्रावणबाळ राज्य निवृत्तीवेतन योजनेच्या लाभार्थ्यांना डीबीटी पोर्टलद्वारे अर्थसहाय्य वितरित २६ ऑगस्टपर्यंत कागदपत्रांची पूर्तता करण्याचे आवाहन

नांदेड दि. २२ : जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या सूचनेनुसार महानगरपालिका क्षेत्रातील संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील लाभार्थ्यांना अर्थसहाय्यचे वितरण डीबीटी पोर्टलद्वारे होणार आहे. त्यासाठी प्रत्येक लाभार्थ्यांनी आपली सर्व प्रकारची अद्ययावत माहिती जसे की बँक/पोस्ट खात्याची पहिल्या पानाची पासबुकची झेरॉक्स, आधार कार्डची झेरॉक्स, दिव्यांग प्रमाणपत्र , दुर्धर आजार असेल तर त्याबाबतचे प्रमाणपत्र, मोबाईल नंबर इत्यादी तलाठी शेळकेव श्रीमती बोकन यांच्याकडे अथवा संजय गांधी निराधार योजना कार्यालय, नांदेड शहर जिल्हाधिकारी कार्यालय येथे २६ ऑगस्ट २०२४ पर्यत जमा करावे असे आवाहन तहसिलदार संगायो शहर नांदेड यांनी केले आहे.
जे लाभार्थी विहित मुदतीमध्ये आपले अद्ययावत कागदपत्रे जमा करणार नाहीत त्यांचे अनुदान त्यांच्या खात्यावर जमा करता येणार नाही असेही तहसिलदार संगायो शहर नांदेड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## आरक्षण-उपवर्गीकरण व क्रिमिलेयर निर्णयाविरोधात भारतीय बौध्द महासभा तालुका शाखेच्या वतीने निवेदन



**लोकादेश न्यूज, किनवट : एस.सी.-एस.टी.आरक्षण उप- वर्गीकरण व क्रिमिलेयर निर्णयाविरोधात विविध सामाजिक व आंबेडकरी संघटनांनी पुकारलेल्या भारत बंदमध्ये सहभागी हेऊन भारतीय बौध्द महासभा तालुका शाखेच्या वतीने येथील उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत राष्ट्रपती व प्रधानमंत्री भारत सरकार यांना बुधवारी ता.२१ रोजी विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.**

बौद्ध महासभा तालुकाध्यक्ष अभि. प्रशात ठमके यांच्या नेतृत्वात तालुका सरचिटणीस प्राचार्य राजाराम वाघमारे, कोषाध्यक्ष भारत कावळे, नांदेड जिल्हा पर्यटन उपाध्यक्ष महेंद्र नरवाडे, राहूल घुले, देविदास मुनेश्वर, दिलिप भगत, प्रा.सुभाष गडलिंग, प्रा.आनंद सरतापे, पांडुरंग भालेराव, जनार्दन भगत, कपील कांबळे, रत्नदिप येरेकार, श्रीरंग हापसे यांच्यासह भारतीय बौध्द महासभेचे तालुका शाखेचे पदाधिकारी, उपासक तसेच बहुजन समाज पार्टीचे भीमराव पाटील, चंद्रकांत कांबळे यांचे सह पदाधिकारी व बहुसंख्य कार्यकर्ते यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालयात नायब तहसिलदार रामेश्वर मुंडे यांना निवेदन दिले.

भारतातील अनेक महापुरुषांनी सामाजिक ऐक्य प्रस्थापित करण्यासाठी जनजागृती केली. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महत्प्रयासाने जाती तोडल्या, विविध जातींचे वर्गीकरण केले, त्यांचे सामाजिक मागासलेपण आणि शैक्षणिक मागासलेपण नष्ट करण्यासाठी आरक्षण दिले आणि सत्तेत भागीदार केले. आर्थिक समृद्धीसाठी नाही. याला संविधान सभेकडून संवैधानिक मान्यता मिळाली, ज्यामुळे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या लोकांमध्ये सामाजिक ऐक्य निर्माण झाले.

तथापि, माननीय सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगष्ट २०२४ रोजी एक घटनाविरोधी निकाल दिला आहे ज्यामध्ये असे म्हटले आहे की अनुसूचित जाती, जमातीची एकता भंग करणे, या श्रेणींमध्ये उप-श्रेणी निर्माण करणे आणि मूलभूत विचार न करता क्रिमीलेयर तयार करणे. हे संविधानाची संकल्पनेनुसार अन्यायकारक आहे. त्यामुळे अनुसूचित जाती-जमातींतर्गत जातगटांची निर्मिती झाल्यास त्यांना रोस्टरनुसार योग्य प्रतिनिधित्व मिळू शकणार नाही. वैकल्पिकरित्या, आरक्षण रद्द केले जाईल.

तेव्हा याबींचा निषेध नोंदवून निवेदनात पुढील प्रमुख मागण्या नमूद केल्या आहेत. : केंद्र सरकारने कायदा करून संसदेत अध्यादेश काढावा, यासाठी केंद्र व राज्य सरकारने अनुसूचित जाती आणि जमातीच्या प्रवर्गात प्रस्तावित केलेल्या जातींचे उपवर्गीकरण आणि क्रिमीलेअरच्या निर्णयाची अंमलबजावणी करू नये, केंद्र सरकारने एस.सी. व एस.टी. च्या आरक्षणासाठी एकच कायदा करून त्याचा अनुसूची ९ मध्ये समावेश करावा जेणेकरुन कोर्टाने त्यात हस्तक्षेप करू नये, केंद्र सरकारने सर्व जातींची जनगणना करून त्यांना जातीनुसार आरक्षण द्यावे, खाजगी विद्यापीठे, खाजगी आस्थापने आणि कंत्राटी भरतीमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी आरक्षण लागू करावे, मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची नियुक्ती न्यायिक नियुक्ती आयोग स्थापन करून आणि आयोगाच्या परीक्षेद्वारे व्हायला हवी, सध्याच्या कॉलेजिअम पध्दतीने नाही.

बहुजन समाज पार्टी, किनवट-माहूर विधानसभा महिला आघाडी च्या वतीने महामहिमा राष्ट्रपती भारत सरकार, नवी दिल्ली यांना अनुसूचित जाती जमाती चे वर्गीकरण व त्यांना क्रीमीलेअर लावण्या संदर्भात सुप्रीम कोर्टाने दिलेला १ ऑगस्ट २०२४ रोजीचा संविधान विरोधी निर्णय रद्द करण्यासाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलविणे व आरक्षणला भारतीय संविधानाच्या नवव्या अनुसूचित टाकणे विषयी, निवेदन सहाय्यक जिल्हाधिकारी, उपविभागीय कार्यालय, किनवट येथे देण्यात आले, नायब तहसीलदार आर. टी. मुंडे यांनी निवेदन घेतले, निवेदनावर बसपा महाराष्ट्र नेता प्रा.डॉ.आनंद भालेराव, महिला आघाडी अध्यक्ष सुनंदाताई पाटील, आयु. योगिता मुनेश्वर, युवराज रिंगणमोडे अशोक सोनाळे, सतीश मीरासे, प्रा.अजय पाटील. पंजाब शेरे सुधीर पाटील, के एन. पिंपरे, विशाल नवरंगे, डी. एच. वाघमारे ईत्यादी कार्यक्रत्याच्या स्वाक्ष-या आहेत.

## एस.सी.एसटी आरक्षणात क्रिमिलेयर लावून वर्गीकरण करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा भीम आर्मीच्या वतीने निषेध



लोकादेश न्यूज, किनवट : एस.सी. / एस.टी. आरक्षणात क्रिमिलेयर लावून व वर्गीकरण करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या निषेधार्थ भीम आर्मीच्या वतीने दि. २१ ऑगस्ट रोजी पकारलेल्या भारत बंद मध्ये भीम आर्मी किनवट तालुका व शहर शाखेने भारत बंद आंदोलनात सहभागी होवून आंदोलन यशस्वी केले. किनवट येथे सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालयात नायब तहसिलदार मुंडे यांच्या मार्फत देशाचे महामहिम राष्ट्रपती यांना या संदर्भात निवेदना पाठविण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, दि. १ ऑगस्ट २०२४ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने एस.सी./ एस.टी. आरक्षणात क्रिमिलेयर लावून व वर्गीकरण करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला आहे. हा उच्च न्यायालयाचा निकाल डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संविधानाच्या विरूध्द आहे. यासाठी भीम आर्मीचे संस्थापक अध्यक्ष तथा नगीना लोकसभा मतदारसंघाचे खासदार ॲड. चंद्रशेखर आजाद यांनी दि. २१ ऑगस्ट २०२४ रोजी भारत बंदची हाक दिली. या हाकेला प्रतिसाद देत दि.२१ ऑगस्टच्या भारत बंद आंदोलनात भीम आर्मी किनवट तालुका व शहर शाखेने आपला सहभाग नोंदविला. खा. ॲड. चंद्रशेखर आजाद यांच्या आदेशानुसार देशातील सर्वच जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी धरणे आंदोलन करून निवेदन देण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यांच्या निवेदनातील मागण्या पुढील प्रमाणे १) जातीवर आधारित जनगणना करण्यात यावी, २) सर्व विभागामध्ये अनुसूचित जाती व जमाती तथा इतर मागास प्रवर्गातील आरक्षण कोटा पूर्ण करण्यात यावा. ३) अशासकीय संस्थांमध्येही आरक्षण प्रणाली लागू करण्यात यावी. ४) जो पर्यंत सर्व विभागांमध्ये अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागास प्रवर्गाचा आरक्षण कोटा पूर्ण होत नाही तो पर्यंत आरक्षणाची ही तरतूद संविधानाच्या नवव्या अनुसूचिमध्ये समाविष्ट करण्यात यावे. जेणे करून आरक्षणाच्या तरतूदीमध्ये कोणत्याही प्रकारची छेडछाड करता येणार नाही.

सर्वोच्च न्यालयाने दिलेला निकाल अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या हिताचा नसून तो असंवैधानिक आहे व तो अनुसूचित जाती जमातीसाठी घातक असल्याने भीम आर्मी तालका किनवट व शहर शाखेने भारत बंद आंदोलनात आपला यशस्वी सहभाग नोंदविला. निवेदनावर तालुकाध्यक्ष सिध्दांत खोब्रागडे, उपाध्यक्ष शिलरत्न पाटील, सचिव शेंदूपान मुनोर, कार्याध्यक्ष निवेदक कानिंदे, सोशल मिडीया प्रमुख अरूण शेंद्रे, यांचेसह अभय नगराळे, राहूल उमरे, शरण लोखंडे यांचेसह अनेकांच्या स्वाक्ष-या आहेत.

## बदलापूर घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडीतर्फे निषेध आंदोलन



**लोकदेश न्यूज, किनवट : बदलापूर व महाराष्ट्र राज्यात विविध ठिकाणी बालिका व महिलांवर लैंगिक अत्याचार झाल्याबाबत व गृह मंत्रालय अशा घटनाना आळा घालण्यात व राज्यातील कायदा व सुव्यस्था अबाधित राखण्यात अपयशी ठरल्याने लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपींविरुद्ध तात्काळ कठोर कारवाई करा व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा राजीनामा घेण्याच्या मागणीसाठी महाविकास आघाडीतर्फे काळयाफिती लावून जिजामाता चौक येथे निषेध आंदोलन करण्यात आले.**

अत्याचार प्रकरणात गृह मंत्रालयाची भूमिका ही संशयास्पद दिसून येत आहे. दिवसेंदिवस महिला अत्याचाराच्या वाढत चाललेल्या घटनांचा काळ्या फिती बांधून निषेध करण्यात आला. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष प्रकाश गब्बा राठोड शिवसेना उबाठाचे तालुकाप्रमुख मारुती दिवसे पाटील, कॉंग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष के.सूर्यकांत रेड्डी, शहराध्यक्ष कॉंग्रेस गिरीश नेम्मानीवार, रा.कॉ.शरद पवार चे शहराध्यक्ष जैहरोद्दीन खान, शिवसेना बाळासाहेब ठाकरे शहर प्रमुख प्रशांत कोरडे, रा.कॉ.शरद पवार ता.यु. अध्यक्ष बालाजी बामणे, अमरदीप कदम यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी या निषेध आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदविला होता.

## सोयाबीनच्या घसरत्या दराबाबत हस्तक्षेप करा-कॉ. अर्जुन आडे



लोकादेश न्यूज, किनवट, ता.२४ : खरीप हंगामातील सोयाबीन बाजारात येण्यापूर्वीच सोयाबीनचे दर घसरले आहेत. सोयाबीनचा उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढलेला असतांना, सरकारने जाहीर केलेल्या हमी दरापेक्षा ७९२ ते १,३९२ रुपये प्रति क्विंटल कमी दराने शेतक्यांना गतवर्षीचे सोयाबीन विकावे लागत आहे. त्यामळे या परिस्थितीमध्ये सरकारने तातडीने हस्तक्षेप करून शेतक्यांचा होत असलेला तोटा थांबवावा व आगामी काळात सोयाबीनला जास्त भाव मिळेल अशी व्यवस्था करावी, अशी मागणी किसान सभेचे राज्य उपाध्यक्ष कॉ.अर्जुन आडे यांनी केली आहे.

केंद्र सरकारने खरीप हंगामासाठी सोयाबीनला ४ हजार ८९२ प्रति क्विंटल हमीभाव जाहीर केला आहे. ज्या शेतक्यांनी आपले गतवर्षीचे सोयाबीन कमी भावामळे न विकता जतन करून ठेवले होते; ते आता विकावयास काढले असता, त्यांना बाजारामध्ये केवळ ३५०० ते ४१०० रुपये प्रति क्विंटल भाव मिळत आहे. यंदाच्या खरीपातील सोयाबीन पिकाची अद्याप आवक सुरू झालेली नाही, परंतु, दर मात्र कोसळलेले आहेत. दर वर्षी सोयाबीन निघते तेव्हा बाजारपेठेत भाव खूप खाली उतरतात. हमीदराने खरेदीसाठी शासकीय केंद्रे लवकर सुरू होत नाहीत. सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणामुळे सोयाबीनचे दर गत दोन वर्षापासून सातत्याने घसरत आहेत. आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा परिणाम म्हणून जेव्हा सोयाबीनचे दर ११ हजार रुपये प्रति क्विंटल पर्यंत पोहोचले होते. तेव्हा सरकारने तातडीने हस्तक्षेप करत सोयापेंड आयातीचा निर्णय घेतला. सोयातेल आयातीला खुले प्रोत्साहन दिले आहे. त्याचा परिणाम म्हणून सोयाबीनचे दर सातत्याने कोसळत आहेत.

केंद्र सरकारने मोठा गाजावाजा करून सोयाबीनचे हमीदर जाहीर केले , मात्र हंगामाच्या अगोदरच शेतक्यांना हमीभावापेक्षा ७९२ ते १३९२ रुपये प्रति क्विंटल तोटा सहन करीत सोयाबीन विकावे लागत असेल तर ही अत्यंत अन्यायकारक व खेदजनक बाब आहे. केंद्र सरकारने याबाबत तातडीने हस्तक्षेप करावा व बाजारपेठेत किमान हमी दराच्या वर सोयाबीनला भाव मिळेल यासाठी उपाययोजना कराव्यात; अन्यथा सोयाबीन उत्पादक शेतक्यांचा आक्रोश सरकारला बुडवेल, असा इशारा किसान सभेने दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात आहे.

### टी.सी.हरवली आहे

**माझी चव्हाण मो.अलमास मो.असलम नावाची महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय, गोकुंदा ता.किनवट येथून घेतलेली इयत्ता दहावी पासची टी.सी. गोकुंदा ते किनवट प्रवास करीत असतांना हरवली आहे.**
**कुणास सापडल्यास त्यांनी कृपया खालील पत्यावर संपर्क करावे.**
**संपर्क पत्ता : चव्हाण मो.अलमास मो.असलम, रा. किनवट जि.नांदेड**

### टी.सी.हरवली आहे

**माझी महोम्मद इरफान महोम्मद युसूफ नावाची कॉस्मॉपॉलीटन विद्यालय, किनवट येथून घेतलेली इयत्ता दहावी नापासची टी.सी. किनवट ते नांदेड प्रवास करीत असतांना हरवली आहे.**
**कुणास सापडल्यास त्यांनी कृपया खालील पत्यावर संपर्क करावे.**
**संपर्क पत्ता : माझी महोम्मद इरफान महोम्मद युसूफ, रा.साठेनगर, किनवट**

# शहरासह ग्रामीण भागात किनवट-माहूर मतदार संघाचे लोकप्रिय
# आमदार भीमराव केराम यांचा वाढदिवस हर्षोल्हासात साजरा





**लोकादेश न्यूज, किनवट : किनवट-माहर विधानसभेचे आमदार भिमराव केराम यांचा वाढदिवस गुरुवारी विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. मतदारसंघाच्या विकासासाठी आजवर शासनाने कोट्यवधींचा निधी दिला आहे. भविष्यातही विकास कामांची घोडदौड सुरूच राहिल, असा विश्वास आमदार भीमराव केराम यांनी गुरुवारी दि.१५ व्यक्त केला.**

**आमदार भीमराव केराम यांच्या वाढदिवसानिमित्त किनवट शहरातील म. फुले चौकात गुरुवारी कार्यकर्त्यांच्यावतीने आयोजित अभिष्टचिंतन सोहळयात ते बोलत होते. वाढदिवसानिमि त्त महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह जिल्ह्यातील विविध पक्षाचे नेते, नागरिकांनी आ. केराम यांना शुभेच्छा दिल्या.**

## माझ्या विकासात्मक कार्यामुळे जनता माझ्यावर अतोनात प्रेम करते; माझे कार्य सत्तेसाठी नसून जनतेसाठी आहे, समाजाचे ऋण फेडण्यासाठी मी अविरत प्रयत्न करणार–आमदार भीमराव केराम



**यावेळी आयोजित कार्यक्रमात आ. केराम म्हणाले की, राजकारण हा माझा व्यवसाय नाही. मी सामाजिक बांधीलकीतून समाजाचे उत्तरदायित्व, ऋण फेडण्याचं काम संपूर्ण समाज घटकाचा किनवट माहूर मतदार संघातील लोकप्रतिनिधी म्हणून मी शक्य तितके विकास कामे, अत्यावश्यक सोयी–सुविधा अतिदुर्गम, डोंगराळ भागातील सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी अविरत प्रधान करत असून माझ्या मतदार संघाचा विकास साध्य करून घेण्यासाठी माझी इच्छा जी दांडगी आहे. 'मी जनतेचा आणि जनता माझी' या एकसूत्री कार्यक्रमानुसार विकासाचा प्रवास कायम ठेवण्यासाठी मी कटिबद्ध आहे. असेही आमदार केराम यांनी सांगितले.**

आ. केराम म्हणाले की, महायुती सरकार सर्वसामान्यांना केंद्रबिंदू मानून विकासाच्या योजना राबवत आहे. किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघाच्या विकासासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी भरीव निधी दिला. निवडणुकीपूर्वी आपण जनतेला दिलेल्या विकास कामांच्या आश्वासनांपैकी बहुतांश आश्वासने पूर्ण होत आहेत, याचा आनंद आहे. अनेकांना दिवसाढवळ्या आमदार झाल्याचे स्वप्न पडत आहेत. बॅनर, पोस्टरबाजी व भिंती रंगवून कुणी आमदार होत नाही, असे ठणकावतानाच त्यांनी पुढील काळातही महायुतीच्या माध्यमातून किनवट - माहर मतदारसंघाच्या विकासाची घोडदौड सुरुच राहिल, असा विश्वास व्यक्त केला.

हु.गोंडराजे मैदान येथे आमदार भीमराव केराम यांना ४०० किलो वजनाचा भव्य दिव्य हार मोठ्या क्रेनमशीनद्वारे घालून कार्यकर्त्यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या.भाजपाचे युवानेते कुलदीप चिकाटे, सचिन आठवले संभाजी सोनकांबळे व त्यांच्या मित्र परिवाराने या कार्यक्रमाचे आयोजन केले.

तसेच घोटी, सारखणी, वाई, माहूर आदी ठिकाणच्या कार्यकर्त्यांकडूनही अभिष्टचिंतन सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते.

दरम्यान वाढदिवस असल्याचे कळतात राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजितदादा पवार भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे ग्रामविकास मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीशजी महाजन राज्यसभेचे खासदार अशोकराव चव्हाण माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क करून आमदार भीमराव केराम यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

## सण-उत्सवातील विकृती नाहीशी करून सुसंस्कृत समाज घडवावा-ह.भ.प.श्री.नारायण महाराज



लोकादेश न्यूज, किनवट : ता.२४ सांप्रतकाळी धर्माची जागा धंद्याने तर बोधाची जागा विनोदाने घेतली आहे संस्काराची जागा सत्काराने घेतली तर संस्कृतीची जागा विकृतीने घेतली आहे, म्हणून जो हिंदू समाज पूर्वी सुसंस्कृत होता तो आताच्या काळात विकृत होत चालला आहे. आगामी गौरी- गणेशोत्सव, नवरात्रौत्सव, शारदा उत्सव आदीमध्ये आलेली विसंगती, विकृती ही कोणी दुस-याने आणली नसून, आपणच त्यांना विकृत केले आहे. त्यामुळे हे सर्व सण-उत्सव आपल्या महापुरुषांनी ज्या हेतूने सुरू केले होते, तो उद्देशच सध्या बाजूला सारल्या गेला आहे. त्यामुळे आजच्या तरुणांनी गळयात तुळशी माळ व कपाळी गंध, टिळा लावून पारंपरिक वेशभूषेत आपल्या संस्कृतीत सांगितल्याप्रमाणे येणारे सर्व सण-उत्सव साजरे करून, सुसंस्कृत समाज निर्माण करावा, असे आवाहन ह.भ.प.नारायण महाराज माधापूरकर यांनी केले.

श्रावणमास महापर्व व पंढरपूर वारीच्या 'मावंदे' निमित्य तुळशीमाळ धारण कार्यक्रम व किर्तन सोहळा शुक्रवारी (दि.२३) तालुक्यातील मौजे मांडवा येथे संपन्न झाला. त्याप्रसंगी श्री नारायण महाराज बोलत होते. श्री महाराजांच्या आवाहनाला उपस्थित तरुणाईने उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन जवळपास १०० तरुण मुलां-मुलींनी या कीर्तन सोहळयात महाराजांच्या हस्ते तुळशीमाळ धारण केली. या कीर्तन सोहळयास किनवट-माहूर तालुक्यातील तसेच विदर्भ व तेलंगणातील अनेक भाविक भक्त उपस्थित होते. हा कार्यक्रम मांडवा येथील सनातन धर्म सेवा समितीच्यावतीने आयोजित करण्यात आला होता.

## पेसा क्षेत्रात रुजू होवून काम न करणा-या कर्मचा-यांवर कारवाई करण्याची
### भाजपा महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा संध्याताई राठोड यांची मागणी



लोकादेश न्यूज, किनवट : विविध ठिकाणांहून बदली झाल्यानंतर पेसातंर्गत असलेल्या किनवट - माहूरमध्ये रुजु होऊन नंतर सोयीनुसार प्रतिनियुक्तीवर गेलेल्या ७ कर्मचा-यांवर कारवाई करण्याची मागणी भाजप महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा सौ.संध्या राठोड यांनी केली आहे.

यासंदर्भात नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांना दिलेल्या निवेदनात सौ.राठोड म्हणाल्या की,पेसातंर्गत किनवट - माहूर तालुक्यात ज्या कर्मचा-यांच्या बदल्या करण्यात आल्या.ते ७ कर्मचारी बदलीनंतर किनवट, माहूरमध्ये रुजू झाले. त्यानंतर मात्र त्या कर्मचा-यांनी नांदेड व इतर सोयीच्या ठिकाणी प्रतिनियुक्ती करून घेतली. पेसातंर्गत पगार घेऊन कर्मचारी प्रतिनियुक्तीवर गेल्याने दुर्गम भागाच्या वाडी,तांड्यातील ग्रामस्थांच्या कामांचा खोळंबा होत आहे.बदलीनंतर रुजू झालेले कर्मचारी येथे काम करण्यास टाळाटाळ करीत आहेत ही बाब गंभीर असून,त्या कर्मचा-यांसह त्यांना प्रतिनियुक्ती देणा-या अधिका-यांवरही कारवाई करण्याची मागणी संध्या राठोड यांनी केली आहे.

## पीक विमा मिळाला नसल्यास प्रपत्रात माहिती सादर करण्याचे आवाहन




नांदेड दि. २२ ऑगस्ट :- प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम २०२३-२४ मध्ये सहभाग घेतलेल्या ज्या शेतक-यांना पूर्वसूचना देऊन देखील पिक विमा मिळाला नाही. अशा शेतक-यांनी कृषी विभागाने दिलेल्या प्रपत्रात संपूर्ण माहिती भरुन आवश्यक कागदपत्रासह संबंधित तालुका कृषि अधिकारी तथा सदस्य सचिव तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीच्या कार्यालयात ३ सप्टेंबर २०२४ पर्यत दाखल करावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी भाऊसाहेब ब-हाटे यांनी केले आहे. तसेच प्रपत्र संबंधित तालुका कृषि कार्यालयातून उपलब्ध करुन घ्यावे असेही कळविले आहे.

## किनवट तहसीलमध्ये 'महसूल पंधरवडा' साजरा

**लोकादेश न्यूज, किनवट,दि.१६: तहसीलच्या महसूल विभागाच्या वतीने दि.०१ ते १५ ऑगस्ट दरम्यान तहसील कार्यालयात महसूल पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले होते. या पंधरवड्यात शासननिर्णयात दिलेल्या निर्देशानुसार विविध उपक्रम राबविण्यात आल्याची माहिती तहसीलदार शारदा चौंडेकर यांनी दिली.**



राज्यात महसूल विभागाच्या मार्फत वर्षभर केलेल्या विविध लोकाभिमुख कामकाजाचा आढावा जनतेसमोर ठेवण्यासाठी दर वर्षी दि.१ ऑगस्ट रोजी 'महसूल दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. यानंतर 'महसूल सप्ताह' साजरा करण्यात येत होता. या वर्षी नागरिकांमध्ये महसूल विभागाद्वारे राबविण्यात येणा-या विविध योजनांबाबत जागरूकता वाढावी, महसूल विभागाकडून देण्यात येणा-या सेवा अधिक दर्जेदाररित्या नागरिकांपर्यंत पोहचाव्यात, शासनाबद्दल नागरिकांचा विाास वृद्धींगत व्हावा, यासाठी महसूल दिनासोबत यावर्षी महसूल सप्ताह ऐवजी ०१ ते १५ ऑगस्ट या कालावधीत महसूल पंधरवड्याचे आयोजन करून विविध लोकाभिमुख उपक्रम राबविण्यात आले.

यामध्ये एक ऑगस्टला 'महसूल दिन' साजरा केल्यानंतर पुढे प्रति दिन अनुक्रमे 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेंतर्गत साहाय्यता कक्षाचा आरंभ, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय, कृषी मार्गदर्शन कार्यक्रम, शेती, पाऊस आणि दाखले, युवा संवाद, महसूल- जन संवाद, महसूल ई-प्रणाली, सैनिक हो तुमच्यासाठी, आपत्ती व्यवस्थापन या विषयी मार्गदर्शन करण्यात आले. दि.१२ ऑगस्ट रोजी 'एक हात मदतीचा- दिव्यांगांच्या कल्याणाचा' या उपक्रमांतर्गत नायब तहसीलदार विकास राठोड यांनी तालुक्यातील दिव्यांगांच्या विविध समस्या,अडचणी जाणून घेऊन त्याबद्दल मार्गदर्शन केले. पुढील तीन दिवसात महसूल अधिकारी/ कर्मचारी यांचे प्रशिक्षण, महसूल पंधरवडा वार्तालाप आणि महसूल संवर्गातील कार्यरत सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी संवाद, उत्कृष्ट अधिकारी- कर्मचारी पुरस्कार वितरण आदी उपक्रम राबवून दि.१४ ऑगस्ट रोजी सायंकाळी महसूल पंधरवड्याची सांगता करण्यात आली. महसूल पंधरवडा यशस्वी करण्यासाठी अव्वल कारकून विजय सुरुशे, महसूल साहाय्यक शालिनी पवार, मंडळ अधिकारी दाऊदखान, फिरोजखान पठाण, मंगेश वांगीकर यांचेसह महसूल अधिकारी व कर्मचा-यांनी परिश्रम घेतले.

**महसूल पंधरवडा अंतर्गत १ ऑगस्ट २०२४ रोजी तहसिल कार्यालय, किनवट येथे मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा शुभारंभ तहसीलदार डॉ.शारदा चौंडेकर यांचे हस्ते करण्यात आला. तसेच २ ऑगस्ट रोजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था गोकुंदा येथे तहसीलदार डॉ.शारदा चौडेकर, मंडळ अधिकारी वांगीकर व शाळेचे प्राचार्य यांनी विद्यार्थी यांना मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेबद्दल माहिती दिली. ३ ऑगस्ट रोजी तहसिल कार्यालयं किनवट येथे मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेबद्दल नागरिकांना माहिती देण्यात आली. ४ ऑगस्ट रोजी तहसील कार्यालय किनवट येथे स्वच्छ व सुंदर म्हणजे कार्यालय अंतर्गत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. ५ ऑगस्ट कृषी मार्गदर्शन योजनेबाबत तालुका कृषी अधिकारी यांनी नागरिकांना कृषी योजनेबाबत माहिती दिली ६ ऑगस्ट रोजी डॉ. शारदा चौंडेकर तहसीलदार किनवट यांनी विद्यार्थ्यांना शेती व पाऊस बाबत मार्गदर्शन केले ७ ऑगस्ट रोजी सहाय्यक जिल्हाधिकारी कावली मेघना भा.प्र.से. यांच्या अध्यक्षतेखाली महसूल पंधरवडा अंतर्गत उपविभागीय स्तरावरील कार्यक्रमात किनवट व माहूर येथील महसूल कर्मचारी अधिकारी तसेच उपविभागातील लोकप्रतिनिधी, स्वातंत्र्यसैनिक, ज्येष्ठ नागरिक, युवा वर्ग, दिव्यांगजन, शेतकरी उपस्थित होते. या कार्यक्रमात शासनाच्या विविध योजनांच्या लाभार्थ्यांना धनादेश प्रमाणपत्रे दाखले लाभ मंजुरी आदेश इत्यादीचे वाटप करण्यात आले. तसेच २०२३-२४ या वर्षात उत्कृष्ट काम करणा-या अधिकारी कर्मचा-यांना प्रशासित प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले ८ ऑगस्ट रोजी महसूल व जनसंवाद कार्यक्रमांतर्गत तहसील कार्यालय किनवट येथे माहिती देण्यात आली. ९ ऑगस्ट रोजी महसूल ई- हक्क प्रणाली बाबत सर्व नागरिकांना माहिती दिली. १० ऑगस्ट रोजी सैनिक हो तुमच्यासाठी या योजनेअंतर्गत माजी सैनिक यांच्या अडीअडचणी तहसील कार्यालयात किनवट येथे आयोजित कार्यक्रमात नायब तहसीलदार राठोड यांनी त्यांच्या समस्या जाणून घेऊन तात्काळ सोडविण्याबाबत सांगितले. ११ ऑगस्ट रोजी बळीराम पाटील महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन बाबत विद्यार्थी तसेच नागरिकांना तहसीलदार किनवट यांनी मार्गदर्शन दिले १२ ऑगस्ट रोजी ना.तहसिलदार राठोड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या कार्यक्रमांत दिव्यांगाच्या योजनेबाबत त्यांना माहिती देण्यात आली. १३ ऑगस्ट रोजी तहसील कार्यालय किनवट येथे महसूल अधिकारी कर्मचारी यांच्यासाठी संवाद प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येऊन प्रशिक्षण देण्यात आले. १४ ऑगस्ट रोजी महसूल व पंधरवाडा वार्ताला अंतर्गत अधिकारी कर्मचारी यांनी महसूल विषयाबाबत चर्चा केली.**

साप्ताहिक लोकादेशचे मालक, प्रकाशक, संपादक **साजीदोद्दीन शरफोद्दीन बडगुजर** यांनी मुद्रक **शेख राजीक शेख खाजामिया** यांच्या हिंदूस्थान ऑफसेट प्रिंटींग प्रेस, हनुमान मंदिर जवळ किनवट ता.किनवट जि.नांदेड-431 804 (महा.) येथे मुद्रित करून बडगुजर भवन मोमीनपुरा, किनवट ता.किनवट जि.नांदेड-431 804 (महा.) येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR/2007/20732 फोन/फॅक्स नं. (02469) 221666 भ्रमणध्वनी : 09850900628 ईमेल : sajidbadgujar@gmail.com, lokadesh@gmail.com